## सांगोला येथील दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
## नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २३/२०२२ मधील नि. २९ खालील आदेश

(हफीजा शेख विरुध्द शफुद्दीन मुजावर व इतर)

CNR NO. MHSO-2000-0079-2022

प्रस्तुत अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. १० यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथनानुसार, दाव्याचे काम चालू असताना दि. ३०/०९/२०२२ रोजी प्रतिवादी क्र. १० वकील उस्मान मुजावर हे मयत झाले आहेत. मयत प्रतिवादी क्र. १० यांना प्रतिवादी क्र. १०अ शकीलबानु वकील मुजावर, प्रतिवादी क्र. १०ब आसिफा इरफान शेख व प्रतिवादी क्र. १०क हातीम वकील मुजावर असे वारस आहेत. करीता प्रतिवादी क्र. १० चे नावापुढे मयत असे नमुद करुन त्यांचे वारस अभिलेखावर आणण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. १३ विरुध्द अर्ज विना म्हणणे चालविणेत आला.

४. सदर अर्जावर प्रतिवादी क्र. ६ ते ८ तर्फे म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादीचे कथन की, नि. २५ वरती दिलेले म्हणणे याकामी समजणेत यावे. तसेच प्रतिवादी क्र. ११ यांनी नि. ३१ ला दिलेले म्हणणे याकामी वाचण्यात यावे अशी विनंती केली आहे.

५. दोन्ही पक्षातर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने नि. २४ सोबत मयत प्रतिवादी क्र. १० यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. अर्जातील मजकूर आणि दाव्याचे स्वरुप पाहिले असता असे दिसून येते की, दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार समाविष्ठ करणे आवश्यक आहे. आवश्यक पक्षकारांच्या अभावामुळे दाव्यांस तांत्रीक अडचण राहू शकते. सर्व पक्षकारांच्या समावेशाशिवाय दाव्याचा

निकाल, अंमलबजावणी योग्य होणे शक्य नाही ही सर्व परिस्थीती पहाता अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे. वादी करु इच्छीत असलेली दुरुस्ती केल्याने प्रतिवादींच्या न्याय्य हक्कांवर कोणताही परिणाम होणार नाही. याउलट दाव्याच्या अंतिम निकालाच्या वेळी संदिग्धता राहणार नाही. सदरची दुरुस्ती ही तांत्रीक स्वरुपाची आहे, त्यामुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात किंवा विषयात बदल होणार नाही. अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, अर्ज मंजूर केल्यामुळे दोन्ही पक्षकारांमध्ये वाद मिटण्यास मदत होणार आहे. त्यामुळे भविष्यातील गुंता टाळण्यासाठी सदरची दुरुस्ती करण्यास परवानगी देणे आवश्यक वाटते. सबब, खालीलप्रमाणे आदेश –

**आदेश**

१. अर्ज (नि. २९) मंजूर करण्यात येतो.

२. सदर आदेशाच्या दिनांकापासून वादी यांनी अर्जामध्ये मागितलेली दावा दुरुस्ती करुन दावा दुरुस्ती प्रत १४ दिवसांचे आत हजर करावी.

POTDAR BHAGYASHRI MADHUKAR

Digitally signed by POTDAR BHAGYASHRI MADHUKAR
Date: 2025.04.05 17:45:54 +0530

सांगोला. (सौ. बी. एम. पोतदार)

दिनांक: २९/०३/२०२५. दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of Stenographer | : | Shri. A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Mrs. B. M. Potdar, Civil Judge, J. D.& J. M. F. C. Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 29.03.2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 05.04.2025 |